SHREEMATI NATHIBAI DAMODAR THACKERSEY
**WOMEN'S UNIVERSITY**
NAAC ACCREDITED
1, Nathibai Thackersey Road, Churchgate, Mumbai - 400 020.
Telegram : UNIWOMEN ● Telephone : 2203 1879 ● Fax : 2201 8226
Website : www.sndtwomensuniversity.in

Ref. No. ॲफी.जन.१/परिपत्रक/२०११-१२/ २६६३ मार्च ३१, २०१२

**अतिमहत्वाचे**

# परिपत्रक

**मा. महोदय/महोदया,**

सर्व संबंधित प्राचार्यांना या **परिपत्राकाव्दारे** कळविण्यात येते कि ज्या **अधिव्याख्यात्यांच्या** नेमणूका **१९.०९.१९९१ ते ०३.०४.२०००** पर्यंत नेट/सेट करण्याच्या अटीवर केलेल्या आहेत व त्यातील काही अधिव्याख्यात्यांनी **पी.एचडी/एम.फील** किंवा **नेट/सेट** करुन त्यांच्या नेमणूका विद्यापीठाने नियमित केल्या आहेत, अशा सर्व अधिव्याख्यात्यांची माहिती शासनाच्या **"विवरणपत्र" 'अ' व 'ब'** मध्ये भरुन सोमवार, **दि. ०२.०४.२०१२ दुपारी ०३: ०० वाजेपर्यंत** विद्यापीठाकडे (संलग्नता विभाग) **सीडी व हार्ड कॉपीसह (ISM- DVB-TT-Surekh** या फॉन्टमध्ये ) खास दुतामार्फत पाठवावी. सदरहू माहिती वेळेत न पाठविल्यास विद्यापीठ जबाबदार रहाणार नाही, याची नोंद घ्यावी. सीडी व हार्ड कॉपी दोन प्रतित पाठवावी. त्याचप्रमाणे विवरण पत्र 'अ' मधील ६ नंबरच्या रकान्यामध्ये सदरहू अधिव्याख्यात्याची ' initial date of joining ' नमूद करावी.

(डॉ. एस्. कुमुदावल्ली)
कुलसचिव (अतिरीक्त भार)

**सोबत** : शासनाचे विवरण पत्र

**प्रति,**
मा. प्राचार्य/प्राचार्या,
एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठासी संलग्नित असलेली
सर्व अनुदानित महाविद्यालये (महाराष्ट्र राज्य फक्त)

Affi./Jan. 2012-Marathi Letter/vishal

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
Web : www.dirhe.org.in
E-Mail : dhepune@yahoo.co.in
फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११५३

क्र. युएनआय/नेट-सेट/विशि(६)/२०१२/ दिनांक: ३० मार्च, २०१२

<u>अत्यंत महत्वाचे/तातडीचे</u>

प्रति,

१. कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे
महाराष्ट्र राज्य.

२. सर्व विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

**विषयः दि. १९.९.१९९१ ते ३.४.२००० या कालावधीतील बिगर नेट/सेट अध्यापकांच्या सेवा नियमित करुन त्यांना अनुषंगिक लाभ देण्याबाबत..**

संदर्भः १. शासनपत्र क्र.:बैठक २०१२/(७६/१२)/विशि-१ दि. २६ मार्च, २०१२
२. विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र क्र.: एफ १-३/२०११ (पीएस)एक्झांप दि. १५.३.२०१२
३. या संचालनालयाचे पत्र क्र.: युएनआय/नेट-सेट/विशि(६)/२०११/१०३८१ दि. २८ मार्च, २०१२

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भ पत्र क्र. ३ कृपया अवलोकनी घ्यावे. सदर पत्रामध्ये (परिच्छेद एक) पुढीलप्रमाणे अंशतः बदल करण्यात येत आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. १५.३.२०१२ च्या पत्रान्वये दि. १९ सप्टेंबर, १९९१ ते ३ एप्रिल, २००० या कालावधीतील बिगर नेट/सेट अधिव्याख्यात्यांच्या सेवा, त्यांनां **<u>संबंधित विद्यापीठाने सूट दिलेल्या दिनांकापासून</u>** ग्राहय धरण्यात याव्यात असे शासनास कळविले आहे. सदर पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाचे संदर्भांकित आदेश विचारात घेता आपल्या विद्यापीठातील व संलग्नित महाविद्यालयातील, बिगर नेट/सेट अधिव्याख्यात्यांना विद्यापीठाकडून, ज्या दिनांकास नेट/सेट मधून सूट देण्यात आलेली आहे. त्या दिनांकापासून कॅस चे लाभ द्यावयाचे झाल्यास किती अतिरीक्त आर्थिक भार येईल याबाबतची माहिती पुढील विवरणपत्रामध्ये सादर करावी.

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने विवरणपत्र अ मधील रकाना क्र. ६ व विवरणपत्र ब मधील रकाना क्र. ७ मध्ये अंशतः बदल करण्यात आलेला आहे. सुधारीत विवरणपत्रे सोबत जोडण्यात येत आहेत.

संदर्भ पत्र क्र. ३ परिच्छेद २ ते ७ मध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

सदर माहिती अचूक स्वरुपात व विहीत कालमर्यादेमध्ये सादर करावी.

(डॉ.प्र.रा.गायकवाड)
प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१.

प्रतः मा.विकास तु. कदम- कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२. यांना संदर्भांकित पत्राच्या अनुषंगाने माहितीस्तव सादर.

# विवरणपत्र अ

विद्यापीठाचे नावः

| अ.क्र. | अध्यापकाचे नाव | विद्यापीठामध्ये नियमित सेवेत नियुक्तीचा दिनांक | यु.जी.सी.कडे प्रस्ताव सादर केलेल्या पत्राचा क्र. व दिनांक | यु.जी.सी.ने नेट/सेट मधून सूट दिलेल्या पत्राचा क्र. व दिनांक | विद्यापीठाने नेट/सेट मधून सूट दिल्याचा दिनांक | सूट दिलेल्या तारखेपून कॅस लागू केल्यास वरिष्ठ वेतनश्रेणी देय होणारा दिनांक | सूट दिलेल्या तारखेपासून निवडश्रेणी देय होणारा दिनांक | रकाना क्र. ७ व ८ मधील तारखांना वेतननिश्चिती करावयाची असल्यास येणा-या आर्थिक फरकाचा एकुण भार (वर्षनिहाय परिगणना करुन) | शेरा/अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | एकुण = | | |

सहसंचालक (उच्च शिक्षण)
------ विभाग -----